




# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे








वर्ष ५ । अंक १८१ । सोमवार ६ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## राहुरी पोटनिवडणुकीत भाजपकडून अक्षय कर्डिले यांची दमदार एन्ट्री

### दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल । वडिलांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार; भावनिक क्षणांनी सभागृह दुमदुमले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भाजपाचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर जाहीर झालेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी त्यांच्या चिरंजीव युवा नेते अक्षय कर्डिले यांनी भाजप पक्षाच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महापौर ज्योतीताई गाडे, माजी मंत्री बबनराव पाचपुते, आमदार सुरेश धस, आमदार मोनिकाताई राजळे, ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, काशिनाथ लवांडे, अलकाताई कर्डिले, महेंद्र भैय्या गंधे, संदीप कर्डिले, उदयसिंह पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी अक्षय कर्डिले यांनी स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या आई अलकाताई कर्डिले यांनी औक्षण करून आशीर्वाद दिला. आईची गळाभेट घेताना अक्षय कर्डिले भावूक झाले असून उपस्थितांनाही हा क्षण भावनिक करून गेला. कार्यकर्त्यांनी ''शिवाजीराव कर्डिले अमर राहो'' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.

यावेळी अक्षय कर्डिले म्हणाले की, ''राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी वडिलांच्या जागेवर उमेदवारी अर्ज दाखल करत आहे. गेल्या तीस-पस्तीस वर्षांपासून वडिलांनी जनतेशी जिव्हाळ्याचे, कौटुंबिक नाते निर्माण केले होते. आज ती संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आली आहे. माझ्या आयुष्यातील ही पहिली निवडणूक असून वडील माझ्यासोबत नाहीत, ही सर्वात मोठी वेदना आहे. मात्र त्यांचा वारसा पुढे नेत सर्वसामान्य जनतेची सेवा करण्यासाठी रात्रंदिवस काम करणार, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. ■ पान ४ वर

### पालकमंत्री विखेंची शिष्टाई सफल

## प्राजक्त तनपुरेंची तलवार म्यान, गोविंद मोकाटे यांनी थोपटले दंड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने रिक्त झालेल्या राहुरी-नगर विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतून माजी राज्यमंत्री तथा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते प्राजक्त प्रसाद तनपुरे यांनी शेवटच्या क्षणी आपली तलवार म्यान केली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे व भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज तनपुरे यांची भेट घेऊन बंद दाराआड चर्चा केली. तसेच खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांचे फोनवर बोलणे करून दिले.

या शिष्टाईला यश येऊन अखेर तनपुरेंनी उमेदवारी अर्ज भरणार नसल्याचे जाहीर केले. तनपुरेंची तलवार म्यान झाल्याने भाजपच्या गोटातील चलबिचल काही प्रमाणात कमी झाली असून, अक्षय कर्डिलेंविरोधात या जागेवर आता कर्डिलेंचे पारंपरिक विरोधक, माजी जिल्हा परिषद सदस्य गोविंद मोकाटे हे ■ पान ४ वर

> **कोण आहेत गोविंद मोकाटे?**
>
> जेऊर बायजाबाईचे गटातून जिल्हा परिषद सदस्य राहिलेले गोविंद मोकाटे हे कर्डिलेंचे पारंपरिक विरोधक म्हणून नगर तालुक्याच्या राजकारणात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. तत्पूर्वी ते नगर तालुका पंचायत समितीचे सदस्य होते. नंतर जिल्हा परिषद सदस्य झाले. सात वर्षांपूर्वी, सन २०१८ मध्ये त्यांची मुलगी या गटातून विजयी झालेली आहे.

### प्रलंबित वीज प्रश्नावर टाकळी ढोकेश्वरमध्ये आंदोलन

## महावितरणच्या अधिकाऱ्यांना बांगड्यांचा आहेर देत कार्यालयाला ठोकले टाळे!



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित वीज प्रश्नावरून गेल्या अनेक दिवसांपासून धुमसणाऱ्या असंतोषाचा आज अखेर उद्रेक झाला. गेल्या तीन वर्षांपासून मंजूर असूनही आरडीएसएस () योजनेतील सिंगल फेज वीज कनेक्शन देण्यास टाळाटाळ करणाऱ्या महावितरण प्रशासनाचा निषेध नोंदवण्यासाठी आज टाकळी ढोकेश्वर येथील उपअभियंता कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी जबाबदार अधिकाऱ्यांना बांगड्यांचा आहेर देऊन कार्यालयाला कुलूप ठोकले. या टाळेबंद आंदोलनामुळे महावितरण प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली.

लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यासाठी आरडीएसएस योजनेतंर्गत महत्त्वाची वीज कामे मंजूर करण्यात आली होती. मात्र, ■ पान ४ वर

> **अरेरावीची भाषा करणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित करा; आंदोलनकर्त्यांची मागणी**
>
> टाकळी ढोकेश्वर येथील महावितरणचे अधिकारी देशमुख यांना निलंबित करण्यात यावे ते शेतकरी वर्गाशी अरेरावीची भाषा करत आहेत अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली देशमुख यांना निलंबित करण्यासंदर्भात वरिष्ठ अधिकार्यांकडे तक्रार करण्यात आली आहे. संबंधित टाकळी ढोकेश्वर येथील अधिकाऱ्याविषयी आंदोलनकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली होती व त्यांची असलेली नाराजी आंदोलनातून दिसून आली.

> **तोडगा निघेपर्यंत टाळे कायम; आंदोलकांची भूमिका**
>
> घटनेची माहिती मिळताच महावितरणचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले, मात्र आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम होते. जोपर्यंत नवीन वीज कनेक्शनच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नाही आणि लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत कार्यालयाचे टाळे उघडले जाणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला. या आंदोलनामुळे टाकळी ढोकेश्वर परिसरातील महावितरणचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते. प्रशासकीय दिरंगाईचा निषेध करणारा हा बांगड्यांचा आहेर सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

## संगमनेर शहरात गोमांसासह साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त

### एलसीबीच्या कारवाईत पाचजणांवर गुन्हा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संगमनेर शहरातील कत्तलखाने उध्वस्त केल्यानंतरही या ठिकाणी गोवंशाची कत्तल सुरूच असल्याचे दिसून येत असून, स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत या ठिकाणाहून ८ लाख ६८ हजार रुपये किमतीचे गोमांस व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पाचजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एलसीबीचे पथक दिनांक ५ रोजी संगमनेर शहर परिसरात पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पथकाने निजाम अय्याज कुरेशी (वय-२१ वर्षे), निसार रहेमान कुरेशी (वय-३० वर्षे, दोघे रा. गल्ली नं. २, मदिनानगर, संगमनेर) व मोसीन असलम कुरेशी (वय-२५ वर्षे, रा. गल्ली नं.०१, कादरीनगर संगमनेर) यांना गोमांस वाहनात भरताना ताब्यात घेतले. तर त्यांचे साथीदार अजमत लतिफ कुरेशी (रा. भारतनगर, संगमनेर व कासिफ अनवर कुरेशी (रा.मदिनानगर, संगमनेर) हे दोघे पळून गेले.

आरोपींच्या ताब्यातून ३ लाख १५ हजार रुपये किमतीचे १०५० किलो गोमांस, साडेपाच लाखांचा ■ पान ४ वर

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पॅनल विधीज्ञांची नियुक्ती

### ॲड. महेश शिंदे, ॲड. सुरेश लगड, ॲड. शिवाजी कराळे व ॲड. अनिता दिघे यांचा समावेश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा व सत्र न्यायालयातंर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पॅनल विधीज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष न्यायाधीश शिवाजीराव कचरे व सचिव योगेश पैठणकर यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

या पॅनलमध्ये ॲड. महेश शिंदे, ॲड. सुरेश लगड, ॲड. शिवाजी कराळे व ॲड. अनिता दिघे यांची तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व वकिलांच्या सामाजिक व वकीली व्यवसायाच्या कामाची दखल घेऊन त्यांची नियुक्ती झाली आहे.

ॲड. महेश शिंदे गेल्या पंधरा वर्षांपासून कौटुंबिक न्यायालय, धर्मदाय उपायुक्त कार्यालय येथे वकिली व्यवसाय करीत असून, जय युवा अकॅडमीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, बेटी बचाव बेटी पढाव, मोफत आरोग्य शिबिर व स्वच्छता अभियान यासह शासनाचे विविध प्रकल्पात आणि सामाजिक कार्यात जिल्हाभरात कार्य करत आहे.

ॲड. सुरेश लगड हे विशेष सरकारी वकील असून, अनेक वर्षापासून वकिली व्यवसायाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. त्याचबरोबर विविध सामाजिक संस्थांना व नवोदित वकिलांना मार्गदर्शन, युवकांचे विविध उपक्रम सातत्याने राबवित असतात. ■ पान ४ वर

## जागतिक नवकार महामंत्र दिन जनजागृती सायकल रॅली

### जितो अहिल्यानगर युथ विंगचे आयोजन । आबालवृद्धांनी दिला अहिंसा, विश्वशांती, पर्यावरणाचा संदेश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संपूर्ण जगभरात ९ एप्रिल २०२६ रोजी नवकार महामंत्र दिवस साजरा होत आहे. जगाचे कल्याण आणि शांतता निर्माण करण्याची अलौकिक शक्ती या मंत्रात आहे. नित्यनेमाने नवकार जाप केल्यास अलौकिक ऊर्जा प्राप्त होते. भौतिक जगात आत्मिक शांतता मिळते. याची प्रचीती जगभरात येत असल्याने जागतिक स्तरावर नवकार महामंत्र दिवस साजरा होतो. आचार्यश्रींच्या पुण्यभूमीत नगरमध्ये नवकार महामंत्र दिवस साजरा होत असून यानिमित्त जनजागृतीसाठी जितो अहिल्यानगर युथ विंग च्यावतीने रविवारी सकाळी आनंदधाम येथून भव्य सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत आबालवृद्धांनी उत्साहात सहभागी होऊन जनजागृती केली.

आनंदधाम येथून सकाळी पूज्य आलोकषीजी महाराज यांनी मंगळिक देऊन रॅलीचा शुभारंभ केला. यावेळी जितो अहिल्यानगरचे संस्थापक चेअरमन गौतम मुनोत, विद्यमान चेअरमन आलोक मुनोत, सेक्रेटरी तुषार कर्नावट, सल्लागार समिती सदस्य अमित मुथा, युथ विंग चेअरमन चेतन भंडारी, सेक्रेटरी यश भंडारी, मॅट्रीमनी अपेक्स कमिटी सदस्य मेघना मुनोत, सायकल अभियानाचे कन्व्हेनर अभिनंदन भन्साळी, जेटीआर अपेक्स कमिटी सदस्य गौतम मुथा, लेडीज विंग चेअरमन संगिता मुथियान, व्हाईस चेअरमन सोनाली डुंगरवाल, जेबीएन कन्व्हेनर मनोज चोपडा, अजित बोरा, निखिल गांधी, दर्शन चोपडा, रितेश पटवा, सम्यक मुनोत, आयुष मुनोत यांच्यासह सर्व समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायकलिंगपटू चंद्रशेखर मुळे, नितीन पाठक, केतन बलदोटा, हेमंत लहाडे, मंगेश सातपुते, श्रीकांत वंगारी, भरत झंवर, संतोष उंधरे, लहू गावडे, सत्यनारायण पुरोहित , रूपेशकुमार भांबरे, अनिल सुराणा, संभाजी मोहिते, साधना मोहिते

जसमित वाधवा, दिनेश संकलेचा आदींचे विशेष सहकार्य लाभले.

आनंदधाम-मार्केट यार्ड-बंगाल चौकी- खिस्त गल्ली- कापड बाजार- दाळ मंडई - रामचंद्र खुंट- कोठी रोड ते आनंदधाम या रॅलीचा मार्ग होता. केशर गुलाब मंगल ■ पान ४ वर

## ज्या शाळेने घडवले, त्या शाळेचे ऋण कधीच फेडता येत नाही - सभापती प्रा. राम शिंदे

### । संत गाडगेबाबा आश्रम शाळेच्या १९५६ च्या पहिल्या विद्यार्थ्याचा 'सहर्ष चंद्रदर्शन' सोहळा उत्साहात संपन्न । परिसस्पर्श आत्मचरित्र पुस्तिकेचे प्रकाशन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संत गाडगेबाबा आश्रम शाळेचे (आत्ताची राष्ट्रीय पाठशाळा)१९५६ सालचे पहिले विद्यार्थी तथा वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेले डॉ. नामदेव पंडित यांनी 'सहर्ष चंद्रदर्शन' सोहळ्याचे आयोजन आपल्या मूळ विद्यालयात करून शाळेशी असलेले ऋणानुबंध जपण्याचा प्रेरणादायी संदेश घालून दिला.

या प्रसंगी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी, ''ज्या शाळेमुळे आपण घडलो, समाजात उभे राहिलो, त्या शाळेचे ऋण आयुष्यभर फेडता येत नाही. डॉ. पंडित यांनी शाळेशी नाळ जपून ठेवत एक आदर्श निर्माण केला असून तो प्रत्येक विद्यार्थ्याने घ्यावा,'' असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप, संस्थेचे अध्यक्ष ॲ . विद्याधर काकडे, उपमहापौर धनंजय जाधव, माजी महापौर भगवान फुलसुंदर, माझी उपमहापौर गणेश भोसले माजी सनदी अधिकारी अमिताभ चंद्र, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ . विमलताई ढेरे, नगरसेवक प्रकाश भागानगरे , सुरेश बनसोडे , अविनाश घुले, गोरख पडोळे , गणेश कवडे, विकी जगताप, संजय चोपडा, डॉ. अभिजीत पाठक, डॉ. सोमानी.दादाभाऊ चितळकर, सतीश लोटके, ॲड बाळासाहेब काळे, नेवासा ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### नगरमध्ये 'जमाते इस्लामी हिंद'चा ईद मिलन सोहळा उत्साहात संपन्न



**अहिल्यानगर- ऐतिहासिक नगर शहरात जमाते इस्लामी हिंदच्या वतीने आयोजित रमजान ईद मिलन सोहळा कासिम खानी मस्जिद येथे उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुरआन पठणाने झाली. मौलाना हाफिज कय्युम यांनी सुरेल आवाजात कुरआन पठण करून वातावरण भक्तिमय केले. त्यानंतर कुरआनातील ''हे मानवांनो! आम्ही तुम्हा सर्वांना एका पुरुष आणि स्त्रीपासून निर्माण केले'' या संदेशाच्या माध्यमातून प्रेम, बंधुभाव आणि शांततेचा प्रभावी संदेश उपस्थितांना देण्यात आला. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडियमचे शैलेश राशिनकर, इंजिनियर अविनाश कुलकर्णी, डॉ. दत्तात्रेय नागरे, स्नेहालय संस्थेचे ॲड. शाम असावा आदी मान्यवरांनी समाजात एकता व जातीय सलोखा जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. इकराम काटेवाला यांनी आपल्या भाषणात समाजात सलोखा, परस्पर आदर आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना जमाअत-ए-इस्लामी हिंदचे स्थानिक अध्यक्ष नईम सय्यद यांनी मांडली. सूत्रसंचालन मुश्ताक पठाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. अश्फाक सय्यद यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जमाते इस्लामी हिंदच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी अल्पोपहारासह पारंपरिक शिरखुर्म्याचा आस्वाद घेतला.या ईद मिलन सोहळ्यामुळे समाजात एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा जपण्यासाठी मदत होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.**

### पुणे येथे रविवारी बोरा परिवारांचे अखिल भारतीय स्तरावरील पहिले एक दिवसीय भव्य संमेलन

**अहिल्यानगर- संपूर्ण भारतात जैन समाजातील सर्व प्रकारचे बोरा परिवार विविध ठिकाणी वास्तव्यास आहेत. नोकरी, व्यवसायानिमित्त विविध ठिकाणी स्थायिक झालेल्या सर्व बोरा परिवारांना एका व्यासपीठावर आणून आपापसात संवाद व्हावा, एकोपा वृद्धिंगत व्हावा, विचारांचे आदानप्रदान व्हावे यासाठी अखिल भारतीय बोरा फाउंडेशन, पुणे यांच्या तर्फे जैन समाजातील सर्व प्रकारच्या बोरा परिवारांचे अखिल भारतीय स्तरावरील पहिले एक दिवसीय भव्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. रविवार दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५:३० यावेळेत श्री. वर्धमान सांस्कृतिक भवन, बिबवेवाडी, पुणे येथे हे संमेलन होणार आहे. या संमेलनामध्ये महाराष्ट्र तसेच भारत भरातील जैन समाजातील सर्व प्रकारचे बोरा परिवार मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. इतिहासात प्रथमच सर्व बोरा परिवार एकत्र येणार आहेत. आपापसात परिचय वाढून सुसंवाद साधण्याची संधी यामुळे मिळणार आहे. तरी अहिल्या नगर शहर व जिल्ह्यातील बोरा परिवाराच्या सदस्यांनी या ऐतिहासिक संमेलनाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन अखिल भारतीय बोरा फाउंडेशन तर्फे सर्व बोरा परिवारांना करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - संजय बोरा ( मो. ९८२२२ ८७४३९), प्रकाश बोरा (मो. ९८५०८ ८८८८४)**

# वाड्या-वस्त्यांवरील कच्चे रस्ते पक्के व्हावे - आमदार काशिनाथ दाते सर

## नारायणगव्हाण कांडेकर दरा रस्ता कामास सुरुवात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** गेल्या विधानसभा निवडणूकीतील विजय संपादन केल्यापासून तालुक्यातील वाड्या-वस्त्यांवरील कच्च्या रस्त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी आपण सातत्याने पुढाकार घेत असून नुकतेच पुन्हा एकदा नव्याने नारायणगव्हाण येथील कांडेकर दरा रस्ता सुधारणा कामाचे भूमिपूजन करताना आ. दाते बोलत होते. शासनाच्या २५१५ योजना अंतर्गत १५ लाख रुपयांच्या निधीतून या कामास मंजुरी देण्यात आली आहे.

यावेळी बोलताना आ. दाते म्हणाले, ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार रस्ते सुविधा मिळणे अत्यावश्यक आहे. वाड्या-वस्त्यांवरील कच्चे रस्ते पक्के करण्यासाठी आपण कटिबद्ध असून या कामांमुळे नागरिकांच्या दळणवळणाच्या अडचणी दूर होऊन विकासाला गती मिळणार आहे.
या कार्यक्रमास माजी सभापती गणेश शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, लाडकी बहिण योजना तालुकाध्यक्ष सुनील थोरात, उद्योजक सुखदेव पवार, भाजप



सरचिटणीस सागर मैड, राष्ट्रवादी महिला अध्यक्षा सुषमा रावडे, मा. सरपंच सुरेश बो-हुडे सर, भाजप नेते काशिनाथ नवले, युवासेना तालुका अध्यक्ष तारा दरेकर, बाळासाहेब चव्हाण, बाळासाहेब नवले, हेमंत कांडेकर, पत्रकार दिपक करंजुले, सहादु शेळके, पोपटराव नाईक, मेजर काशिनाथ नवले, मेजर विठ्ठल कांडेकर, मेजर सतीश गाडेकर, हुसेन शेख, धनंजय नाईक, सचिन कांडेकर, शंकरराव कांडेकर, संदीप कांडेकर, सुर्यभान कांडेकर, पांडुरंग शेळके, गणेश नवले, विष्णू दरेकर, भानुदास वेताळ, अविनाश टुडे, फक्कडराव शेळके, नारायण कांडेकर, लताबाई कांडेकर, मनीषा कांडेकर, शीतल कांडेकर, संदीप कांडेकर, चंदर कांडेकर, भरत भोसले, दादासाहेब शेळके, सुदाम नवले, साहेबराव शेळके, मेजर सतीश चिपाडे, सुभाषशेठ चिपाडे, किसन चिपाडे, राहुल

> **''गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली असून ग्रामस्थांसाठी हा अत्यंत दिलासादायक निर्णय आहे. आमदार काशिनाथ दाते सरांच्या प्रयत्नांमुळे हे काम मार्गी लागले असून यामुळे गावाच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल.''**
>
> **- सुरेश बो-हुडे सर,**
> **मा. सरपंच नारायणगव्हाण**

कांडेकर आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता कच्चा असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. विशेषतः पावसाळ्यात चिखल व घसरड्या परिस्थितीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. आता या रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीस मोठा दिलासा मिळणार असून परिसराच्या सर्वांगीण विकासाला बळ मिळणार आहे.

# पैठणमध्ये कालिका देवी मंदिरात चोरी दानपेटी फोडून रक्कम व दागिने लंपास



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील रंगारहट्टी परिसरात असलेल्या कालिका देवी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत दानपेटीतील रोकड व दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे चोरट्यांनी दानपेटी फोडून तिचे कुलूप व पेटी परिसरातच फेकून दिल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रोख रक्कम तसेच देवीला अर्पण करण्यात आलेले दागिने चोरून नेले. सकाळी मंदिर उघडताना हा प्रकार लक्षात आला. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच पैठण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून चोरट्यांचा माग काढण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, मंदिर परिसरात यापूर्वीही चोरीच्या घटना घडल्या असल्याचे समोर येत आहे. सुमारे एक वर्षापूर्वी मोहरमच्या ताजिये व पंजे याच परिसरातून चोरीला गेल्याची घटना घडली होती. त्यामुळे परिसरातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांनी पोलिसांकडून कठोर कारवाई व कडक सुरक्षा उपाययोजनांची मागणी केली आहे.

# द आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थी कौन्सिलचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** द आयकॉन पब्लिक स्कूल, आहिल्यानगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६२७ साठी भव्य पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक, प्राचार्या दिपिका नगरवाला, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, शिक्षकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या समारंभातून जुन्या स्टुडंट कौन्सिलमधील पदाधिकाऱ्यांकडून नवीन कौन्सिलकडे जबाबदाऱ्यांचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले. विश्वास, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे प्रतीक म्हणून हा समारंभ पार पडला. टायटन, युनिकॉर्न, फिनिक्स आणि ट्रोजन या चार हाऊसच्या रंगतदार सादरीकरणातून 'एकतेत



विविधता' हा संदेश अधोरेखित झाला.

नवीन कौन्सिलला बॅच व सॅश देऊन सन्मानित करण्यात आले. शाळेचे कॅप्टन म्हणून भार्गव पिंपळे आणि बानी मकर, तर क्रीडा कॅप्टन म्हणून युवान शर्मा आणि वैष्णवी जगताप यांची निवड करण्यात आली. हाऊस कॅप्टन म्हणून अनुज दरेकर व राधिका पाटील (टायटन), जयदीप करपे व आर्या चोरबेले (फिनिक्स), आदित्य जगताप व सिया सुराणा (युनिकॉर्न) तसेच सम्यक मुनोत व अस्मी खटाळ (ट्रोजन) यांनी पदभार स्विकारला.

संचालक कर्नल आर. सी. राणा यांच्या हस्ते नवीन कौन्सिलला शपथ देण्यात आली. त्यांनी शाळेच्या मूल्यांचे पालन करत प्रामाणिकपणे कार्य करण्याची प्रतिज्ञा केली. यावेळी विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. 'आयकॉन लीडरशिप अवॉर्ड' अथर्व माहेश्वरी आणि विधी नरुला यांना प्रदान करण्यात आला. 'बेस्ट ऑल-राऊंडर' पुरस्कार अथर्व माहेश्वरी यांना देण्यात आला. 'स्पोर्ट्स कॅप्टन' पुरस्कार प्रणव सैधणे आणि अवंतिका सोनवणे यांना, तर 'बेस्ट इन स्पोर्ट्स' पुरस्कार प्रणव सैधणे यांना देण्यात आला.

# हिरडपुरी गोदापात्रातून वाळूचा बेधडक उपसा; दोन जिल्ह्यांत 'सिस्टम' निष्क्रिय!

## रात्रभर ट्रॅक्टरची लगबग; महसुलाला कोट्यवधींचा फटका । ग्रामस्थ हतबल; ''तक्रार करावी तरी कुणाकडे?'' संतप्त सवाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील हिरडपुरी परिसरातील गोदापात्रातून वाळूचा अवैध उपसा अक्षरशः बेधडक सुरू असून, दोन जिल्ह्यांच्या सीमारेषेचा गैरफायदा घेत हा प्रकार खुलेआम सुरू असल्याचे उघड झाले आहे. प्रशासन मात्र याकडे डोळेझाक करत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, रात्रीच्या अंधारात ट्रॅक्टर व डंपरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वाळूची वाहतूक केली जाते. पहाटेपर्यंत ही वाहतूक सुरू राहत असल्याने परिसरात धुळीचे लोट, आवाज आणि रस्त्यांची दुरवस्था वाढली आहे. ग्रामस्थांनी अनेक वेळा महसूल व संबंधित विभागांकडे तक्रारी केल्या; मात्र ठोस कारवाईचा अभाव असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर वाढत आहे. ''दोन्ही जिल्ह्यांच्या सीमेमुळे जबाबदारी टाळली जाते,'' असा आरोपही ग्रामस्थांनी केला. या अवैध वाळू उपशामुळे नदीपात्राची झपाट्याने धूप होत असून पर्यावरणीय समतोल धोक्यात आला आहे. त्याचबरोबर शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसत आहे.

तातडीने संयुक्त कारवाई करून अवैध वाळू उपसा थांबवावा व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# माध्यमिक शिक्षक संघटनेचा बेमुदत संपाचा एल्गार

## । समन्वय समितीसोबत माध्यमिक शिक्षक २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर –जिल्हाध्यक्ष सचिन झगडे । जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेच्या बैठकीत निर्णय




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेची कार्यकारिणीची बैठक नुकतीच माध्यमिक शिक्षक भवनात पार पडली. संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली.

महाराष्ट्र शिक्षक फेडरेशनचे उपाध्यक्ष चांगदेवराव कडू यांनी जिल्हा संघटनेने फेडरेशनने ठरवून दिलेल्या दिशा निर्देशामध्ये काम केले पाहिजे असे आवाहन कार्यकारिणीला केले. संघटनेचे मार्गदर्शक शिवाजीराव ढाळे यांनी संघटनेच्या संघर्षाचा इतिहास आणि याआधी संघटनेने केलेल्या आंदोलनाचे यश यांचा आढावा घेतला.

माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे व राज्य संघटनेचे कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा व येणाऱ्या काळात संघटनेच्या दिशादर्शनाबाबत मार्गदर्शन केले.

जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न त्यामध्ये सुधारीत पेन्शन योजना, टीईटीची सक्ती, संच मान्यतेच्या जाचक अटी, पट पडताळणीचे बदलेले निकष, कायम विना अनुदानित शाळांचे स्वयं अर्थसाहित शाळांमध्ये रूपांतरण, शिक्षकेतर बांधवांचे प्रश्न, सरकार जाणीवपूर्वक विविध प्रश्न निर्माण करून संघटना शिक्षकांमध्ये भेद निर्माण करत असल्याचे निदर्शनास आणून दिले. मध्यवर्ती कर्मचारी संघटना व समन्वय समितीच्या माध्यमातून होत असल्याने कर्मचाऱ्यांनी कोणतीही भीती मनात बाळगू नये. या पार्श्वभूमीवर केवळ शिक्षण क्षेत्रातीलच नव्हे तर समाजातील सर्व घटकांनी २१ तारखेपासून सुरू होणाऱ्या बेमुदत संपामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे निर्धार व्यक्त केला.

यावेळी बैठकीस मार्गदर्शक शिवाजीराव ढाळे, चेअरमन अप्पासाहेब शिंदे , राज्य कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे , राज्य उपाध्यक्ष चांगदेव कडू , उपाध्यक्ष भालचंद्र देशमुख (कर्जत), मोहन यादव (जामखेड), संदिप शेंडगे, खजिनदार अशोक सोनवणे (नेवासा), प्रशांत होन(श्रीरामपूर), माजी अध्यक्ष शिरीष टेकाडे, सचिन जाधव (कोपरगाव) तसेच जिल्ह्यातील प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक संघटनेचे सेक्रेटरी अमोल ठाणगे यांनी केले. सूत्रसंचालन उपाध्यक्ष सोमनाथ सुंबे तर आभार हिशोब तपासणीस शिवदास सातपुते यांनी मानले.

# जैन सोशल फेडरेशनने आरोग्य सेवेचा दीपस्तंभ निर्माण केला – मदन कांकरिया

## आनंदऋषीजी नेत्रालयात स्व. कुंदन कांकरिया यांच्या स्मरणार्थ मोफत नेत्र तपासणी शिबिर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी हॉस्पिटल यांचे आशीर्वाद आणि प्रबुद्ध विचारक पूज्य आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने आरोग्यं सेवेचा दीपस्तंभ निर्माण करण्याचे काम जैन सोशल फेडरेशन अविरतपणे करत आहे. समाजात विशेषतः ग्रामीण भागात डोळ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. परिणाम दृष्टीदोष वाढतो. यासाठी आनंदऋषीजी नेत्रालयाच्या माध्यमातून वेळोवेळी शिबिरे घेऊन जास्तीत जास्त रूग्णांचा दृष्टीदोष बरा करण्याचं काम येथील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम करत आहे. अत्याधुनिक नेत्रोपचार सुविधा रूग्णांना मिळण्यासाठी स्व. कुंदन कांकरिया यांनी नेत्रालयाच्या स्थापनेपासून योगदान दिले. त्यांचे हे कार्य पुढे कायम ठेवण्यासाठी कांकरिया परिवार भविष्यातही निश्चित योगदान देईल अशी ग्वाही मदन कांकरिया यांनी दिली.

जैन सोशल फेडरेशनचे सक्रिय सदस्य स्व. कुंदन कांकरिया यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत नुकतेच मोफत नेत्र तपासणी व उपचार मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी श्री भवरीलाल कांकरिया बोलत होते. यावेळी श्री मदनभाऊ कांकरिया, अभय कांकरिया व कांकरिया परिवारातील सदस्य तसेच जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, बाबूशेठ लोढा, डॉ. आशिष भंडारी, नेत्र तज्ज्ञ डॉ. अशोक महाडिक, डॉ. प्रतिक कटारिया, आनंद छाजेड आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, आनंदऋषीजी नेत्रालय येथे जागतिक दर्जाच्या नेत्रोपचार सुविधा उपलब्ध आहेत. नगरसह मराठवाड्यातील रूग्णांना याचा लाभ होत असतो. सावेडी उपनगरातील नागरिकांच्या सोयीसाठी तारकपूर येथे शाखा सुरू करण्यात आली. याठिकाणी गेल्या ५ महिन्यात ५००० पेक्षा जास्त रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला व २०० पेक्षा अधिक नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या. स्व. कुंदन कांकरिया यांनी जैन सोशल फेडरेशनच्या कार्यात योगदान देताना नेत्रालयाच्या विस्तारात मोठे योगदान दिले. त्यांच्या सेवाभावी स्वभावामुळे असंख्य रूग्णांना निर्दोष दृष्टी मिळण्यास हातभार लागला आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### फ्रेंड्स कॉर्पोरेट टी-२० क्रिकेट लीगला उत्साहात सुरुवात



अहिल्यानगर - अहिल्यानगर येथील साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या वाकोडी येथील क्रिकेट मैदानावर फ्रेंड्स कॉर्पोरेट टी-२० क्रिकेट लीगच्या तिसऱ्या पर्वाला नुकताच उत्साहात प्रारंभ झाला. कॉर्पोरेट क्षेत्रातील खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा केवळ सुट्टीच्या दिवशीच रंगणार असल्याने सहभागी खेळाडूंमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले आहे. या स्पर्धेमुळे क्रीडा स्पर्धेबरोबरच परस्पर संवाद व मैत्री वृद्धिंगत होण्यास चालना मिळत आहे. स्पर्धेचे उद्घाटन साईदीप सह्याद्री मणिपाल हॉस्पिटलचे जनरल मॅनेजर डॉ. व्यंकटेश मुळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, अशा क्रीडा स्पर्धांमुळे कामाच्या ताणतणावातून मुक्त होण्यास मदत होते तसेच आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन मिळते. या स्पर्धेचे आयोजन तेजस करमरकर, प्रकाश राठोड व चैतन्य खोलगडे यांनी केले असून साईदीप क्रिकेट अकॅडमीचे संचालक संदीप घोडके यांचे सहकार्य लाभले आहे. यंदाच्या स्पर्धेत अनेक संघांनी सहभाग नोंदविला असून सर्व संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. मागील वर्षांच्या तुलनेत यंदाची स्पर्धा अधिक यशस्वी होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी खेळाडू, प्रेक्षक आणि आयोजक यांच्यात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. आगामी सामन्यांमध्ये अधिक रंगतदार सामने अनुभवायला मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### समाजातील खोट्या 'कॅप्टन'विरोधात जनलोक अदालत रणांगणात!

अहिल्यानगर- देशासाठी रक्त सांडणाऱ्या सैनिकांच्या सन्मानाचे प्रतीक असलेली पदे काही व्यक्तींकडून केवळ नावापुरती वापरली जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. "कॅप्टन" सारख्या संरक्षण दलातील पदांचा अनधिकृत वापर करून समाजात खोटी प्रतिष्ठा निर्माण केली जात असल्याने जनतेच्या मनात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर पीपल्स हेल्पलाईनतर्फे शहरातील हुतात्मा स्मारक येथे १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित जनलोक अदालतमध्ये "डिच्चू फत्ते कॅप्चर!" मोहिमेच्या माध्यमातून अशा खोट्या पदांचा पर्दाफाश केला जाणार असल्याची माहिती जेष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. "कॅप्टन" पदाचा गैरवापर राष्ट्राच्या सन्मानाला धक्का "कॅप्टन" हे केवळ एक संबोधन नसून ते शौर्य, त्याग आणि राष्ट्रसेवेचे जिवंत प्रतीक आहे. अशा पदांचा गैरवापर करणे म्हणजे थेट भारतीय संरक्षण दलांच्या सन्मानाला धक्का देणे होय. जनलोक अदालतने स्पष्ट इशारा दिला आहे की, "खोट्या प्रतिष्ठेच्या आड लपलेले चेहरे आता कायद्याच्या चौकटीत उघड केले जातील." कायदेशीर व नैतिक चौकटीत कठोर निर्णय जनलोक अदालततर्फे कठोर पण पूर्णतः कायदेशीर पद्धतीने ठराव घेऊन महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात येणार आहेत. संरक्षण दलांच्या पदांचा गैरवापर करणाऱ्यांनी तात्काळ तो थांबवावा, अन्यथा योग्य ती कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. "पदाचा सन्मान राष्ट्राचा अभिमान" या विषयावर व्यापक जनजागृती मोहीमही राबविण्यात येणार आहे. ही मोहीम बदनामीसाठी नाही सत्यासाठी आहे"ही अदालत कोणालाही बदनाम करण्यासाठी नाही, पण सत्य दडपण्यासाठीही नाही."नैतिकता आणि कायदेशीर चौकट यांचा समन्वय साधत न्याय मिळवण्यावर भर देण्यात येणार आहे. विरुद्ध निर्णायक लढासमाजात पसरलेल्या चुकीच्या नॉन-जिनेटिक इन्फॉर्मेशन () विरुद्ध निर्णायक लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## शानदार बंगल्यातील आजच्या स्वयंपाक घरात पवित्रता नसते भव्यताच असते - राधाकृष्ण महाराज



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अलिकडे शानदार बंगले उभारले जात आहेत. मात्र त्या बंगल्यातील स्वयंपाक घरात भव्यताच अधिक असते. पवित्रता नसते, असे स्पष्ट प्रतिपादन प.पू. श्रीराधाकृष्ण महाराजांनी केले.

येथील श्री. रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवारातर्फे नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे व्दितीय पुष्प गुंफताना ते बोलत होते.

श्री. राधाकृष्ण महाराज पुढे म्हणाले, आपले स्वयंपाक घर भव्य नव्हे तर सदैव पवित्र असले पाहिजे. जेथे पवित्रता असते तेथे विचार करण्याची आवश्यकता नसते. रस के रूप में ईश्वर प्रगट होते है उसे रसोई कहते हैं रसोई घर ईश्वर का प्राकट्य हैस्नान केल्याशिवाय स्वयंपाक घरात पाऊल ठेवू नये. चप्पल घालून तर अजिबात स्वयंपाक घरात जावू नये. घरात आल्यावर मंदिरात आलो असे वाटले तरच घर उभारण्यातील सार्थकता अनुभवता येईल. घरात चप्पल घालून कधीही वावरू नये. अन्नमय कोषातूनच बाकी कोष कार्य करतात. अन्न उत्तम तर आनंद उत्तम. या आनंदातूनच प्रसन्नता मिळते. स्वयंपाक घराच्या माध्यमातून परिवारातील सर्वांना ईश्वरापर्यंत नेण्याचे अनमोल कार्य गृहिणी करतात. मात्र हे अन्न सात्विक पाहिजे. स्वयंपाक घर पवित्र झाले की, घरातील अर्ध्या समस्या कमी होतात. सात्त्विक अन्नच हा फरक दाखवून देते.

लाखो रुपये कमवणारांना उत्तम भोजनाचे सुख मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अलिशान हॉटेलमधील भोजनाची तुलना घरातील भोजनाशी कदापी होवू शकत नाही. कारण हॉटेलमध्ये प्रधानता धनास असते. घरात प्रधानता आपलेपणास–मायेस–प्रेमास असते.

भगवंताच्या सेवेमधूनच आपल्या जीवनातील दैन्यता जाते. मात्र सेवा करताना अहंकार नसावा. अहंकार आल्यास भगवंत आपली सेवा स्विकारत नाही, हे लक्षात घ्यावे. नारद मुनींसारख्या शुध्द भावाने भगवंताचे गुणगान करावे.

१८००० श्लोकांचे भागवत महापुराण वेदव्यासांनी शुकदेवांना प्रदान केले. पांडवांचे वंशज राजा परिक्षित यांना शुकदेवांनी भागवत ऐकवले. भागवत कथा कलीयुगातील भाविकांना सत्ययुगात रहाण्याचा आनंद मिळवून देते, असा ठाम विश्वास श्री.राधाकृष्ण महाराजांनी व्यक्त केला.

### शहरात प्रथमच १२ ते १८ एप्रिल दरम्यान युवकांचे प्रेरणास्थान

## पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

### जय्यत तयारी सुरू । विविध समित्यांची स्थापना । दि.११ ला शोभायात्रा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आपल्या ऐतिहासिक अहिल्यानगरमध्ये प्रथमच रविवार दि.१२ ते शनिवार दि. १८ एप्रिल २०२६ दरम्यान युवकांचे प्रेरणास्थान असलेल्या वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त शनिवारी दि.११ एप्रिल २०२६ ला सायंकाळी ४ वाजता शानदार शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजक आयुष गुप्ता यांनी दिली.

सर्वश्री सुधीर झालानी, किसनलाल बंग, महेश गुप्ता व प्रदिप पंजाबी म्हणाले, श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकरजी गुप्ता यांच्या प्रेरणेने पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांना प्रथमच नगर शहरात आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांचे अध्यात्मिकता, विनम्रता आणि भक्तीने ओतप्रोत भरलेले जीवन आजच्या युवकांचे विशेष आकर्षण ठरले आहे. भारतीय संत आणि ऋषी–मुनींचा अध्यात्मिकतेचा वारसा युवकांच्या हाती देण्याचे ध्येय समोर ठेवून ते कार्यरत आहेत. साधेपणा आणि सेवा यावर भर देत अध्यात्मिक जीवनशैलीचे महत्त्व ते प्रतिपादन करतात. गोमातांची सुरक्षितता ही सामाजिक जबाबदारी असून गोमातेची सेवा ही भक्तीच होय, असे ते सांगतात.

शनिवारी दि.११ एप्रिल २०२६ ला सायंकाळी ४ वाजता सावेडी मधील मिस्कीन मळ्यातील खंडेलवाल सांस्कृतिक भवन पासून शोभायात्रा निघेल. ही शोभायात्रा प्रोफेसर कॉलनी, आकाशवाणी मार्गे कथा स्थळी येईल. शोभायात्रेच्या अग्रभागी दोन बग्गी असतील. त्यामध्ये श्रीमद् भागवत ग्रंथ आणि राधा–कृष्णाचे वेशभूषेत मुलं रहातील. बॅण्ड पथक, ढोल पथक, वारकरी वेशभूषेतील पथक, मंगल कलश घेतलेल्या १०८ युवती आणि सुवासिनी तसेच शहरासह उपनगरातील स्त्री – पुरुष भाविक शोभायात्रेत सहभागी होतील. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी केली जाईल. शोभायात्रा कथास्थळी आल्यावर श्रीमद् भागवत ग्रंथाची सामुदायिक महाआरती करण्यात येईल.

रविवारी दि.१२ एप्रिल २०२६ ला दुपारी ३.३० वाजता श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ विधीवत करण्यात येईल. या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली असून उत्तम नियोजनासाठी शहरातील मान्यवर प्रतिष्ठित भाविकांच्या विविध समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शहरात ९ एप्रिलला भव्य भीमगीतांचा कार्यक्रम

### आंबेडकरी समाजासह नागरिकांनी उपस्थित राहावे– सुरेश बनसोडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरात भव्य भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांच्या पुढाकारातून होत असलेला हा कार्यक्रम सामाजिक व सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश देणारा ठरणार आहे.



गुरुवार, दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्यासमोर, पांजारपोळ मैदान, माळीवाडा, अहिल्यानगर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या सादरीकरणातून बाबासाहेबांचा विजय असो, जय भीम म्हणत चला, भीमराजा माझा, निळ्या झेंड्याखाली, भीमाच्या नावानं, माझा भीमराजा महान, उठा उठा हो भीमसैनिकांनो ही गाणी विशेषत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित भीमगीते सादर होणार असून, उपस्थितांना एक वेगळा सांस्कृतिक अनुभव मिळणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटन शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार असून, विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमासाठी आंबेडकरी समाजासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांनी समस्त आंबेडकरी समाजाला आवाहन केले आहे की, या भव्य कार्यक्रमाला उपस्थित राहून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करावे आणि कार्यक्रमाचा आनंद घ्यावा.

## उन्हापासून बचावासाठी गरीबांना वाटल्या टोप्या

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** उन्हापासून बचाव करण्यासाठी डोक्यावर टोपी आवश्यक असते. गोरगरीब, रस्त्यावर कचरा वेचणाऱ्यांचे उन्हापासून आपले संरक्षण करता यावे म्हणून यासाठी स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने शहराच्या विविध भागात गरीब नागरिकांना टोप्या वाटप केल्या. या उपक्रमातून स्नेहबंधने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. स्नेहबंध फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या संकल्पनेतून गेल्या दहा वर्षांपासून हा उपक्रम राबवला जात आहे. शहरातील सावेडी, सिव्हिल हॉस्पिटल, दिल्लीगेट, माळीवाडा, स्वस्तिक चौक, मार्केट यार्ड, आनंदधाम, स्टेशन रोड परिसरात उन्हात फिरणाऱ्या गरीबांना टोप्या देण्यात आल्या. यावेळी माजी प्राचार्य एकनाथ जगताप, प्रतिक डहाळे, स्वयंम बास्कर, प्रथमेश राठोड आदी उपस्थित होते. उन्हाच्या तीव्रतेत डोक्यावर संरक्षणासाठी अनपेक्षितपणे टोपी मिळाल्याने नागरिकांनी हात जोडून स्नेहबंधचे आभार मानले.

## भागवत कथामृत भगवंताजवळ घेऊन जाते - राधाकृष्ण महाराज

### शानदार शोभायात्रेने श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये श्री.रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवाराने आयोजित केलेल्या प.पू.श्री.राधाकृष्ण महाराजांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

प्रारंभी पटेलवाडी मंगल कार्यालयपासून शानदार शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेच्या अग्रभागी बॅण्ड पथक होते. डोंगरगण येथील हभप पुंडलिक महाराज जंगले शास्त्री यांच्या आश्रम शाळेतील आणि निमगाव वाघा येथील हभप विठ्ठल महाराज फलके यांच्या श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी टाळ–मृदुंगाच्या तालावर भजन म्हणत होते. लाल रंगाच्या साड्या परिधान करून मंगल कलश घेतलेल्या २१ सुवासिनी आणि डोक्यावर भागवत ग्रंथ, भगवान श्रीकृष्णांची मूर्ती व तुळसी वृंदावन घेतलेल्या महिलांसह पांढऱ्या रंगाच्या पोषाखात पुरुष सहभागी झाले होते. शानदार बग्गीमध्ये प.पू.राधाकृष्ण महाराज आणि हभप दिनकर महाराज अंचवले विराजमान झाले होते. ही शोभायात्रा नवीन टिळक रोडवरून कथा स्थळी नंदनवन लॉन्समध्ये आल्यावर औक्षण करून स्वागत करण्यात आले.



श्री.सतीश इंदाणी यांनी प्रास्ताविक केले. श्री.रामनिवास इंदाणी यांच्या हस्ते ग्रंथपूजन आणि महाराजांचा सन्मान करण्यात आला. हभप दिनकर महाराज अंचवले यांचा सत्कार श्री.विजय इंदाणी यांच्या हस्ते तर हभप मुकुंदकाका जाटदेवळेकर यांचा सत्कार शिवप्रसाद इंदाणी यांच्या हस्ते करण्यात आला. या दोन्हीही महाराजांनी कथा सोहळ्याच्या उत्कृष्ट आयोजनाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. सौ.चारूता शिवकुमार आणि सौ.शारदा होशिंग यांनी उद् घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. व्यासपीठावरील सजावट भाविकांकडून वाहवा मिळवणारी ठरली. श्रीगोपाल राधाकृष्ण गोविंद गोविंद... या भावमधूर गीताने राधाकृष्ण महाराजांनी कथा निरूपणाचा श्रीगणेशा केला. ते म्हणाले, भागवत कथेचे श्रध्देने श्रवण केल्याने भगवंताजवळ जाणे सुकर होते. भागवत कथा पापनाशिनी आहे. उध्दार करणारी आहे. दुर्लभ समाधीचा आनंद देणारी आहे. ही कथा श्रवण करताना भगवान श्रीकृष्ण आपल्या समोर बसले आहेत, हा भाव ठेवावा. आजच्या कलीयुगातील दोषांना नष्ट करण्याचे प्रभावी साधन ही कथा आहे. भगवान श्रीकृष्णांच्या नामस्मरणाने आणि त्यांच्या लिला श्रवणाने समाधी सुखाचा आनंद मिळतो. भागवत कथा श्रवण करताना श्रीहरी आपल्या चित्तात विराजमान होतात. जेथे माझी कथा तेथे मी असे भगवंतांनी म्हटलेच आहे. त्याची अनुभूती येते.

भगवान श्रीकृष्णांच्या कथा श्रवण करण्यापलिकडे दुसरे कोणतेच मोठे सुख नाही. सात्विक आहाराने तन–मन पुलकित होते. दुसऱ्यांचे दोष पाहू नका. क्रोध करू नका. निंदा करू नका. आत्मचिंतन करत आत्मकल्याण करून घ्या, असे आवाहन राधाकृष्ण महाराजांनी केले.

उद् घाटनाच्या पहिल्याच दिवशी स्त्री–पुरूष भाविकांची अलोट गर्दी झाल्याने आयोजक इंदाणी परिवाराचा उत्साह दुणावला. सामुदायिक महाआरती आणि प्रसाद वाटपाने सांगता करण्यात आली.

## अरणगाव शिंदेवाडी जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षणाची दारे खुली करून दिली, त्याच परंपरेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळांच्या माध्यमातून शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा परिषद शाळा ही ग्रामीण भागातील ज्ञानमंदिर असून बालवयातच सुसंस्कृत विद्यार्थी घडविण्याचे कार्य या शाळांमधून होत असल्याचे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके यांनी केले.

नगर तालुक्यातील अरणगाव शिंदेवाडी जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके, संदेश कार्ले, सरपंच पोपटराव पुंड, ज्येष्ठ नेते किसन लोटके, मुख्याध्यापिका जयश्री घोलप, राधाकिसन गिरवले गुरुजी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप शिंदे, शिक्षण प्रेमी पोपट शिंदे, दत्तात्रय शिंदे, अमित शिंदे, बबन शिंदे, बाळू शिंदे, गोरख शिंदे, मिनीनाथ शिंदे, अंशाबापू शिंदे, ॲड शिवाजी शिंदे, गणपत शिंदे, नाथा शिंदे, किरण शिंदे, अनिल शिंदे, संतोष शिंदे, शरद डमढेरे, प्रभाकर शिंदे, देविदास वाळके अर्जुन लोटके आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना राणीताई लंके यांनी सांगितले की, जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थी आज विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत. शिंदेवाडी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपला वारसा पोहोचविण्याचे काम या उपक्रमातून होत आहे. माझेही शिक्षण याच शाळेत झाले असून या शाळेने मला घडवले, असे सांगत त्यांनी बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

सरपंच पोपटराव पुंड यांनी सांगितले की, स्पर्धेच्या युगात शिक्षणाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषद शाळांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबवणे गरजेचे असून त्यातून विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळते. अरणगाव ग्रामपंचायत शाळेच्या विकासासाठी कटिबद्ध असून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मुख्याध्यापिका जयश्री घोलप यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये बालवयातच शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक, क्रीडा, नाट्य, गायन या क्षेत्रांबद्दल आवड निर्माण व्हावी यासाठी शाळेमार्फत वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात. आधुनिक युगात करिअरच्या विविध संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यासाठी शाळा महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

संदीप शिंदे यांनी सांगितले की, शिंदेवाडी येथे अंगणवाडी ते चौथीपर्यंत शिक्षण उपलब्ध असून बालवयातच विद्यार्थ्यांचा पाया भक्कम करण्यासाठी ग्रामस्थ नेहमी शिक्षकांना सहकार्य करतात. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून अध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कलागुण सादर केले. सण–उत्सवांच्या माध्यमातून आपली संस्कृती जोपासली जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार बालवयातच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून ते प्रेरणादायी आहेत.

या स्नेहसंमेलनात बालकलाकारांनी विविध सादरीकरणे करून पालक व ग्रामस्थांची मने जिंकली. कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे कौतुक करताना उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## हिंद सेवा मंडळाचे नुतन कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांचा भारत विद्यालयात सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकतेच स्पर्धा परीक्षेत चांगले यश मिळविले आहे. तसेच शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे शाळेच्या लौकिकात भर पडत आहे.भारत विद्यालयाच्या वैभव प्राप्तीसाठी संस्थेमार्फत लागणाऱ्या सर्व प्रकारच्या मदतीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. असे आश्वासित करून विद्यालयाचा चेहरा मोहरा येत्याकाळात निश्चित बदलला जाईल. असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे नूतन कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी केले.

मिरजगाव येथील हिंदसेवा मंडळ संचलित भारत विद्यालयात हिंद सेवा मंडळाचे नूतन कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,उपकार्याध्यक्ष ज्योतीताई कुलकर्णी,सहाय्यक सचिव योगेश देशमुख यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी हे होते.या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर,प्रशासकीय अधिकारी संजय मुदगल,शालेय समितीचे सदस्य विकास कटारिया,गणेश झरकर,विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रस्ताविकात चेअरमन डॉ.रमेश झरकर यांनी विद्यालयाच्या विविध विकास कामांचा आढावा घेतला.विद्यालयाच्या गुणवत्ते बाबतीत त्यांनी समाधान व्यक्त केले.

सौ.ज्योतीताई कुलकर्णी म्हणाले,विद्यालयाच्या प्रगतीमध्ये कर्मचाऱ्यांचे एकजुटीचे प्रयत्न आवश्यक असतात.सर्वांनी वैयक्तिक जबाबदारी घेऊन काम केल्यास विद्यालयाची प्रगती होऊ शकते.

मानद सचिव संजय जोशी म्हणाले,विद्यालयाच्या प्रगती करता सर्व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल समाधान व्यक्त करत यापुढेही अधिक जोमाने, आत्मीयतेने काम केल्यास विद्यालय निश्चितपणे प्रगतीपथावर जाईल.असा विश्वास व्यक्त केला. संस्थेमार्फत सर्व प्रकारची मदत व मार्गदर्शन करण्यात येईल असे सांगितले.तसेच विद्यालयामध्ये डिजिटल बोर्ड व त्यासाठी लागणारे सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.असे सांगितले.

# अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँकेची उत्कृष्ट आर्थिक कामगिरीची परंपरा कायम – हस्तीमलजी मुनोत

## २६ कोटी ७८ लाखांचा ढोबळ नफा, १६२२ कोटी ३२ लाखांच्या ठेवी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर मर्चंट्स को-ऑप. बँक लि., अहमदनगरच्या संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत दि. ३१ मार्च २०२६ अखेरच्या वर्षासाठीचे अनऑडिटेड आर्थिक निकाल मंजूर करण्यात आले आहे . परंपरेनुसार बँकेने स्थिर वाढ, पारदर्शक कारभार, मजबूत आर्थिक शिस्त आणि भक्कम आर्थिक पाया दर्शविला आहे.

मागील आर्थिक वर्षात बँकेने ग्राहकहिताला प्राधान्य देत कर्जावरील व्याजदरात कपात करून ग्राहकांना दिलासा दिला, ज्यामुळे ग्राहक समाधानात लक्षणीय वाढ झाली आहे. बँकेला आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेने शेड्युल्ड बँकेचा दर्जा दिला आहे, अशी माहिती बँकेचे संस्थापक तथा विद्यमान चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांनी दिली.

या प्रसंगी चेअरमन हस्तीमलजी मुनोत, व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, संजय चोपडा, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड, प्रमिलाताई बोरा, मिनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, सीईओ सुनील पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा आदी उपस्थित होते.

ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर लाभ देऊनही बँकेने उत्कृष्ट कामगिरी नोंदवली असून २५ कोटी ३९ लाखांच्या व्याज सवलतीनंतर २६ कोटी ७८ लाखांचा ढोबळ नफा मिळविला आहे. हे बँकेच्या संतुलित आणि ग्राहकाभिमुख धोरणाचे द्योतक आहे.

आयकर व रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आवश्यक सर्व तरतुदी केल्यानंतर बँकेने ७ कोटी ४४



श्री. हस्तीमल मुनोत – चेअरमन | श्री. अमित मुथा – व्हा.चेअरमन

लाख रुपये इतका निव्वळ नफा मिळविला आहे.या वर्षात बँकेने व्यवसायात भरीव वाढ नोंदवली असून बँकेच्या एकूण ठेवी १६२२ कोटी३२ लाखांवर पोहोचल्या आहेत . गत वर्षाच्या तुलनेत ठेवींमध्ये १६० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. एकूण कर्जवाटप १०४९ कोटी १२ लाख असून कर्ज वितरणात ८१ कोटींनी वाढ झाली आहे. कासा ठेवीत ६६ कोटींची लक्षणीय वाढ झाली आहे.

बँकेच्या मालमत्ता गुणवत्तेत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली असून नेट एनपीए जवळपास ०.६३ टक्क्यांवर आणण्यात यश आले आहे, तसेच एनपीए खात्यांसाठी भरीव आणि सुदृढ तरतुदी करण्यात आल्या आहेत. बँक आज अत्यंत मजबूत आर्थिक पायावर उभी असून २७१ कोटी ८१ लाखांच्या भक्कम राखीव निधीमुळे (सद्य स्थितीत सुमारे २८७ कोटी ६५ लाख) ठेवीदारांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

बँकेचे चेअरमन हस्तीमलजी मुनोत म्हणाले की, ''ग्राहकहित जपत बँकेने मजबूत नफा, भक्कम राखीव निधी आणि जवळपास शून्य एनपीए साध्य केले आहे. तंत्रज्ञान उन्नतीसह सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा देण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील. यामुळे ठेवीदारांचा विश्वास अधिक दृढ झाला असून बँक अत्यंत मजबूत स्थितीत आहे. बँकेच्या यशस्वी वाटचालीत सर्व सहकारी संचालक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष कर्मचारी ग्राहकांना सदैव तत्पर सेवा देण्यात अग्रेसर असतात. तसेच, यावेळी संचालक सीए, आयपी अजय मुथा म्हणाले की, बँक तंत्रज्ञान उन्नतीवर विशेष भर देत असून, यावर्षी संचालक मंडळाचे मानस आहे की, नवीन कोअर बँकिंग सॉफ्टवेअर, युपीआय डायरेक्ट मेंबरशिप, कॉन्टॅक्टलेस कार्ड सेवा, कार्डलेस कॅश विथड्रॉल, ई मॅनडेट यासारख्या आधुनिक डिजिटल सुविधा लवकरच सुरू करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, ज्यामुळे ग्राहकांना अधिक सुरक्षित, जलद आणि सोयीस्कर बँकिंग सेवा उपलब्ध होणार आहेत. बँकेच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ठेवीदार, ग्राहक व सभासदांचा विश्वास अधिक बळकट झाला असून पारदर्शक कारभार, आर्थिक शिस्त आणि ग्राहकहिताचे धोरण यामुळे बँक प्रगतीच्या नव्या उंचीवर पोहोचत आहे.

व्हाईस चेअरमन अमित मुथा म्हणाले की, काळानुरूप बदल करत मर्चंटस बँकेने कॉर्पोरेट बँकिंग सेवा देण्यास सुरुवात केली आहे. मुख्य शाखेचा विस्तार करीत दाळमंडई येथे प्रशस्त 'हेडऑफिस ॲनेक्स' कार्यालय उभारण्यात येत आहे. बँक भविष्यातही शाश्वत वाढ, आधुनिक सेवा, उत्कृष्ट ग्राहक अनुभव आणि आर्थिक समावेश यासाठी कटिबद्ध असून आगामी काळात अधिक मोठी यशस्वी वाटचाल करणार आहे.

# शिक्षणासोबतच धार्मिक संस्कार देणे गरजेचे आहे – किशोर मुनोत

## वैद्यकीय क्षेत्रातील दंतरोग तज्ञ पदवी संपादन केल्याबद्दल कु.मानसी व नमिता भंडारी भगिनींचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कु.मानसी भंडारी व कु.नमिता भंडारी या भगिनींनी अथक परिश्रम घेऊन वैद्यकीय क्षेत्रातील पदवी संपादन केली आहे.या भगिनींचे यशामुळे भंडारी परिवार व समाजाच्या नावलौकिकात भर पडली आहे.भंडारी परिवार हा पूर्वीपासूनच धार्मिक आहे. भंडारी परिवाराने केलेल्या धार्मिक संस्कारामुळेच कु.मानसी व कु.नमिता यांनी उत्तम यश संपादन केले आहे.यापुढील काळात या भगिनींनी समाजासाठी योगदान द्यावे.समाजातील अनेक मुले उच्चशिक्षित होत आहेत.ही समाजासाठी अभिमानास्पद बाब आहे.शिक्षणासोबतच धार्मिक संस्कार देणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे सेक्रेटरी किशोर मुनोत यांनी केले आहे.

नवीपेठ जैनस्थानक येथे कु.मानसी शेखर भंडारी व कुमारी नमिता सचिन भंडारी यांनी वैद्यकीय क्षेत्रातील दंतरोग तज्ञ () पदवी संपादन केल्याबद्दल आनंद चालीसा गुरुकृपा मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे सेक्रेटरी किशोर मुनोत, उद्योजक सुरेश मुनोत,जैन कॉन्फरन्सचे पदाधिकारी बाबूशेठ बोरा,श्रावक संघाचे सेक्रेटरी नितीन कटारिया, विनायक नगर संघपती राजु भंडारी,विहार ग्रुपचे यश शाह,जय आनंद महावीर युवक मंडळाचे उपाध्यक्ष कुंतीलाल राका,उद्योजक रमेश गुंदेचा,विजय गुंदेचा,पारस गुंदेचा,पारस लोढा,सुभाष भंडारी,रमनलाल भंडारी,ईश्वर नहार,भरत बागरेचा,अनिल पितळे,चिराग गांधी, महेश मुनोत,सौ.शिल्पा मुनोत,सौ.वंदना छाजेड, सौ.रिमल गुंदेचा,सौ.अलका गुंदेचा,स्वाती बोरा,सुनिता बोरा,जितेन्द्र बोरा आदी उपस्थित होते.

बाबूशेठ बोरा म्हणाले,कु. मानसी व कु.नमिता भंडारी यांनी मोठ्या परिश्रमाने व जिद्दीने वैद्यकीय क्षेत्रातील पदवी मिळवली आहे.ही कौतुकास्पद बाब आहे.भंडारी भगिनींनी मिळविलेल्या उत्कृष्ट यशामुळे त्यांचे माता–पिता,गुरुजन व समाजाच्या नवलौकिकात भर पडली आहे.समाजातील उच्च शिक्षण करू इच्छिणाऱ्या मुलांना प्रेरणा देणारे असे शिक्षण कु.मानसी व कु.नमिता भंडारी यांनी केले आहे. निश्चितच समाजासाठी ते मोठे योगदान देतील.अहिल्यानगर शहरात प्रसिद्ध दंतरोग तज्ञ म्हणून भंडारी भगिनींनी उज्वलाचे कार्य करावे.अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

सुभाष भंडारी म्हणाले,आळंदी येथील वेदांताचार्य हभप डॉ.नारायण महाराज जाधव यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने कु.मानसी व कु.नमिता भंडारी यांनी उत्तम यश मिळविले आहे.कु.नमिता भंडारी यांचे वडील डॉ.सचिन भंडारी यांनी देखील मार्गदर्शन केले आहे.तसेच भंडारी परिवारास महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांचा आशीर्वाद लाभला आहे.

यावेळी पारस लोढा यांनी सूत्रसंचालन केले.तर आभार रमनलाल भंडारी यांनी मानले. साप्ताहिक आनंद चालीसा कार्यक्रमातील भाग्यशाली भाविकांना स्वाती बोरा,सुनिता बोरा,जितेन्द्र बोरा यांच्या तर्फे प्रभावना भेट देण्यात आली.या कार्यक्रमासाठी जैन समाज बांधव व भगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परमेश्वराची भक्ती विसरल्याने संकटे वाढली – मौलाना शमसुद्दीन

## सुरेगाव येथे कोपरगाव व राहाता तालुक्यांच्या दोन दिवसीय तब्लीगी इज्तेमाची सांगता



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** वर्तमान काळात मानव परमेश्वराची भक्ती विसरून भौतिक साधनांच्या मागे धावत आहे. गरजांपेक्षा अधिक सुखसुविधा आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी तो वेळ खर्च करत असून, त्यामुळे परमेश्वराला विसरून जीवन जगत आहे. यामुळेच दैनंदिन जीवनात विविध संकटांना सामोरे जावे लागत आहे. मानवाने परमेश्वराची प्रार्थना व भक्ती केल्यास संकटे दूर होऊ शकतात, असे प्रतिपादन मौलाना शमसुद्दीन यांनी केले. कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथे राहाता व कोपरगाव या दोन तालुक्यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय तब्लीगी इज्तेमाची सांगता शनिवारी सायंकाळी झाली. यावेळी मौलाना शमसुद्दीन आपल्या प्रवचनात बोलत होते. या कार्यक्रमाला दोन्ही तालुक्यांतील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, प्रत्येकाने खुदा आणि पैगंबर साहेबांच्या आदेशांवर अमल करावा. इस्लाम धर्मातील पाच स्तंभ (अर्कान) आणि दावते तब्लिगचे सहा गुण (सिफात) आचरणात आणल्यास जीवनाचा मार्ग सुकर होतो. वाईट प्रवृत्ती नष्ट होतात. आजचा माणूस स्वतःचे गुण न पाहता इतरांचे अवगुण पाहण्यात वेळ घालवत आहे. त्याऐवजी प्रत्येकाने स्वतःचे अवगुण ओळखून इतरांमधील गुण पाहावेत, यामुळे जीवन अधिक योग्य मार्गावर जाईल. तसेच प्रत्येकाने खुदाचे बंदे म्हणून एकमेकांशी प्रेमाने व माणुसकीने वागावे आणि लोकांच्या सुख–दुःखात सहभागी व्हावे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचा समारोप दुआने करण्यात आला.

या दोन दिवसीय इज्तेमासाठी सुरेगाव येथील कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या ट्रक यार्डमधील मोकळी जागा चेअरमन आमदार आशुतोष काळे व संचालक मंडळाच्या सहकार्याने उपलब्ध करून देण्यात आली होती. या ठिकाणी मुस्लिम बांधवांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.इज्तेमा दरम्यान छोटा बाजारही भरविण्यात आला होता, ज्यामध्ये हिंदू–मुस्लिम बांधवांनी दुकाने लावली होती. दोन दिवसांत मोठी आर्थिक उलाढाल झाली. मुस्लिम स्वयंसेवकांनी पार्किंग, स्वच्छता व इतर व्यवस्था उत्तम प्रकारे सांभाळल्या. तसेच काळे कारखान्याचे कर्मचारी आणि विज वितरण विभागाचे कर्मचारी सुरेगाव ग्रामपंचायतचे अधिकारी कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी आणि हिंदू बांधवांनी देखील सहकार्य केले. सुरक्षेसाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धरमसिंग सुंदरडे, पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. इज्तेमा शांततेत पार पडला. सदर इस्तेमाला कोपरगाव मतदारसंघाचे आमदार आशुतोष काळे, कोपरगाव शहराचे नगराध्यक्ष पराग संधान, सुरेगावचे सरपंच वाल्मीक आप्पा कोळपे, माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब कोळपे, कोळपेवाडीचे सरपंच सूर्यभान कोळपे, काळे कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रवीण शिंदे, उपसरपंच सागर कोळपे सदस्य महेश कोळपे, कोल्हे कारखान्याचे व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर परजणे, संचालक राजेंद्र कोळपे, ज्ञानेश्वर हाळनोर , चंद्रभान हाळनोर, काळे कारखान्याचे कार्यकारी संचालक बोरनारे, सेक्रेटरी सुनील कोल्हे, पोलीस पाटील इंद्रभान ढोमसे, आदींसह अनेक मान्यवरांनी भेट दिली. सदर इज्तेमा यशस्वी करण्यासाठी कोळपेवाडी सुरेगाव ,शहाजापुर, येथील ग्रामपंचायत सदस्य अधिकारी कर्मचारी तसेच कोळपेवाडी शहाजापुर सुरेगाव,कोळगावथडी आणि परिसरातील व तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी अथक परिश्रम घेतले.



**अहमदनगर पहिली मंडळी (कॉंग्रीगेशनल) ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने ईस्टर संडे निमित्त विशेष उपासना आयोजन करण्यात आले. या भक्तीचे मंडळींचे आचार्य रेव्ह. डॉ. सनी पी. मिसाळ यांनी भक्ती उपासना चालवत तसेच कोल्हापूर चर्च कौन्सिलचे रेव्ह. श्रीकांत बी. पठाणे यांनी पुनरुथीत ख्रिस्त गाजवत सर्व भाविकांनी मोट्या आवाजात म्हणत होते. प्रभू उठला आहे ,तो खरोखर उठला आहे. या घोषणा देण्यात आल्या यावेळी मंडळीचे सेक्रेटरी नंद प्रकाश शिंदे, खजिनदार प्रकाश सूर्यवंशी, अमोल काळे, सागर घोडके ,राजेश ओहळ राजेश उजागरे, प्राची थोरात, संगीत सोनवणे यांच्यासह विश्वस्त मंडळी व तरुण संघ व ख्रिस्त बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

(पान १ वरून)

## प्राजक्त तनपुरेंची तलवार म्यान, गोविंद मोकाटे यांनी थोपटले दंड

रिंगणात उतरणार हे स्पष्ट झाले आहे. बारामतीमध्ये काँग्रेसचा उमेदवार देण्याची खेळी महाविकास आघाडीकडून खेळली गेली, तर राहुरीत शरद पवार गटाचे तनपुरे व मोकाटे असे दोन एबी फॉर्म सकाळीच धाडून दिले. तनपुरेंनी माघार घेल्याने दोन दिवसांपूर्वी अपक्ष अर्ज भरलेले गोविंद मोकाटे हे या ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार ठरले असून, कर्डिलेंच्या या पारंपरिक विरोधकाने पुन्हा एकदा दंड थोपटले आहेत. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या जागी महायुतीकडून कर्डिलेंचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देण्यात आली असून, आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चव्हाण तसेच जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत कर्डिलेंनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीकडून या ठिकाणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते व माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे मैदानात उतरणार, अशी चर्चा होती. आज अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या.

आज अक्षय कर्डिलेंचा फॉर्म दाखल करण्यासाठी आलेले भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री विखे यांनी सकाळी तनपुरेंची भेट घेऊन बंद दाराआड चर्चा केली. यावेळी दोन्ही नेत्यांनी आगामी काळात राहुरीतील विकास कामांसाठी सहकार्य करण्याच्या मोबदल्यात पोटनिवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्याची विनंती केली. चव्हाण यांनी तनपुरे यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी बोलणे करुन दिले. यानंतर कार्यकर्त्यांशी चर्चा करून दुपारी तनपुरेंनी आपण निवडणूक अर्ज भरणार नसल्याचे जाहीर केले. त्यामुळे राहुरीत संभाव्य अटीतटीमुळे होणारी भाजपनेत्यांची चलबिचल कमी झाली आहे. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांचे भाचे असलेले तनपुरे या निवडणुकीत उतरले निवडणूक अटीतटीची होणार याची जाणीव भाजपनेत्यांना असल्याने वरिष्ठ नेत्यांना शिष्टाईसाठी पाठविण्यात आले. त्याला यश आल्याने या ठिकाणी तनपुरे लढणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे, तर गोविंद मोकाटे हे महाविकास आघाडीचे उमेदवार असून, या लढतीत चुरस कायम राहिली आहे.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पॅनल विधीज्ञांची नियुक्ती

अहमदनगर बार असोसिएशनचे ते माजी अध्यक्ष आहेत. त्यांची फेरनिवड झाली आहे.

ॲड. शिवाजी कराळे हे मागील २५ वर्षापासून वकीली व्यवसाय करत आहे. ते देखील सामाजिक कार्याशी जोडलेले असून, विविध सामाजिक कार्यात त्यांचे योगदान असते. अहमदनगर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष असून, कौटुंबिक न्यायालयाचे संस्थापक अध्यक्ष आहेत.ॲड. अनिता दिघे अहमदनगर बार असोसिएशनच्या माजी सचिव असून, आधारवड बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून महिला व युवतींसाठी विविध उपक्रम राबवित आहेत.या वकिलांच्या नियुक्तीबद्दल अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे, उपाध्यक्ष ॲड. भाऊसाहेब घुले, जिल्हा सरकारी वकील ॲड सतीश पाटील, ॲड. लक्ष्मण कचरे, ॲड. भुषण बऱ्हाटे, ॲड. दिलीपराजे शिंदे, ॲड. शकील पठाण, डॉ.प्रा. रमेश वाघमारे, ॲड. तुषार शेंडगे, ॲड. गायत्री गुंड, ॲड. पोपट बनकर, रजनी ताठे, ॲड. पुष्पा जेजुरकर, ॲड. मनीषा भिंगारदिवे, ॲड. विद्या शिंदे, ॲड. दिनेश शिंदे, ॲड. प्रशांत साळुंके, ॲड. सुनील तोडकर, ॲड. संतोष शिंदे, ॲड. नाझमीन बागवान, ॲड. उमेश गट, ॲड. धनंजय जाधव, ॲड. आरती शिंदे, ॲड. शिवाजी सांगळे आदींनी अभिनंदन केले.

## राहुरी पोटनिवडणुकीत भाजपकडून अक्षय कर्डिले यांची दमदार एन्ट्री

या उमेदवारी अर्ज दाखल कार्यक्रमाने राहुरी पोटनिवडणुकीचा राजकीय माहोल चांगलाच तापला असून भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महावितरणच्या अधिकाऱ्यांना बांगड्यांचा आहेर देत कार्यालयाला ठोकले टाळे!

महावितरणच्या अधिकाऱ्यांची उदासीनता आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक गावांतील शेतकऱ्यांना अद्यापही अधिकृत वीज कनेक्शन मिळालेले नाही. हक्काच्या विजेसाठी शेतकरी गेल्या तीन वर्षांपासून कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही केवळ पोकळ आश्वासने मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध आज तुटला.

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने हे आंदोलन पुकारण्यात आले होते. राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव ,म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे, आणि राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांच्या नेतृत्वाखाली सकाळी १०:३० वाजल्यापासून शेकडो शेतकरी कार्यालयाबाहेर जमले होते. रणरणत्या उन्हात सलग साडेतीन तास आंदोलकांनी ठिय्या मांडला. प्रशासनाचा निषेध करण्यासाठी शेतकऱ्यांनी सोबत आणलेल्या बांगड्यांचा आहेर अधिकाऱ्यांना सुपुर्द केला, ज्यामुळे वातावरण अधिकच तापले होते. शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, तात्काळ काम सुरू करा अन्यथा कार्यालय उघडू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा सरपंच प्रकाश गाजरे यांनी घेतला.

या आंदोलनात तालुक्याचे लक्ष वेधून घेणारी आंदोलकांची गर्दी जमली होती. यामध्ये सरपंच प्रकाश गाजरे, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव, राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांच्यासह सरपंच अभिजीत झावरे, पांडुरंग आहेर, खंडू भाईक, कैलास सैद, प्रवीण सैद, अनिल आहेर, झांबर दरेकर, बाळासाहेब आहेर, संपत वाळुंज, विठ्ठल रोहकले, अशोक वाळुंज, शुभम काळे, दात्तराय वाळुंज, राजेंद्र दुधवडे, साहेबराव दुधवडे, संदीप गुंजाळ, काळूराम दुधवडे, लक्ष्मण कारंडे, गिरजु सूळ, लहू वाळुंज, ऋषिकेश वाळुंज, संजय पारधी, लहू भुतांबरे, विष्णू वाळुंज, बाबासाहेब वाळुंज, साहिल वाळुंज, भागचंद वाळुंज यांसह म्हसोबा झाप, वारणवाडी, कामटवाडी, वासुंदे, नांदूर पठार, सावरगाव, पळसपुर, काटाळवेढा, काकणेवाडी, खडकवाडी, पळशी या परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

## जागतिक नवकार महामंत्र दिन जनजागृती सायकल रॅली

कार्यालय येथे रॅलीचा समारोप झाला. याठिकाणी सर्वांसाठी पौष्टिक नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. सायकल रॅलीत सहभागी होणाऱ्या सर्वांना मेडल देण्यात आले.

पूज्य आलोकऋषीजी महाराज म्हणाले की, या रॅलीतून विश्वशांती, इंधन बचत, उर्जा बचत, पर्यावरण संवर्धन, समस्त प्राणीमात्रांचे कल्याण, सुदृढ आरोग्याचा संदेश देणार आहे. जितो अहिल्यानगर युथ विंग अतिशय सुंदर उपक्रम राबवित आहे. नवकार मंत्र हा जगासाठी तारक मंत्र आहे. आताच्या जागतिक अशांततेच्या काळात तर अहिंसा व शांततेचे महत्व अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. जगाला तारण्याची व शांतता प्रस्थापित करण्याची ताकद नवकार महामंत्रात आहे. नवकार जाप प्रत्येकाच्या मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा असतो. त्यामुळेच जागतिक स्तरावर नवकार महामंत्र दिवस साजरा केला जातो. या दिव्य आयोजनाचा उद्देश नवकार महामंत्राच्या अद्भुत शक्तीचा प्रचार व प्रसार करणे आणि अधिकाधिक लोकांना या आध्यात्मिक साधनेसाठी प्रेरित करणे आहे.

## ज्या शाळेने घडवले, त्या शाळेचे ऋण कधीच फेडता येत नाही – सभापती प्रा. राम शिंदे

तालुक्यातील माजी सभापती किशोर जोजार , भानस हिवरे तील माजी सरपंच अशोक बोरा,डॉ . राहुल पंडित .बाबुराव दळवी यांच्यासह शिक्षकवर्ग, माजी विद्यार्थी, स्थानिक नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उत्साह, कृतज्ञता आणि भावनिक जिव्हाळ्याचे वातावरण अनुभवायला मिळाले.यावेळी बोलताना डॉक्टर नामदेव पंडित म्हणाले की साली याच शाळेतून शिक्षण पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली. आपल्या यशामागे शाळेचे संस्कार व शिक्षण यांचा मोठा वाटा आहे. हीच शाळा माझ्या आयुष्याचा पाया आहे. इथून मिळालेल्या मूल्यांमुळेच मी आज या स्थानापर्यंत पोहोचलो,'' असे सांगत त्यांनी शिक्षण हीच खरी आणि शाश्वत संपत्ती असल्याचे सांगून शाळेचे संस्कार आयुष्यभर मार्गदर्शक ठरतात, असे मत व्यक्त केले. यशस्वी झाल्यानंतरही आपल्या मूळाशी जोडलेले राहणे आवश्यक असून माजी विद्यार्थ्यांनी शाळेशी नाळ कायम ठेवत समाजासाठी योगदान देण्याची जाणीव ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. पंडित यांनी वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवले असून त्यांच्या या कार्याचा उपस्थित मान्यवरांनी गौरव केला. दरम्यान, डॉ. पंडित यांच्या जीवनप्रवासावर आधारित परिसस्पर्श आत्मचरित्र पुस्तिकेचे प्रकाशन प्रा. राम शिंदे व आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तिकेत त्यांच्या संघर्षमय वाटचालीपासून ते यशापर्यंतच्या प्रवासाचे प्रेरणादायी चित्रण करण्यात आले आहे. या कार्यक्रमातून माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेशी नाळ जोडून ठेवत समाजासाठी योगदान देण्याचा संदेश देण्यात आला. डॉ. राहुल पंडित यांनी आभार प्रदर्शन करत वडील नामदेव पंडित यांच्यावर लिखित परिसस्पर्श आत्मचरित्राचे वाचन केले.

## संगमनेर शहरात गोमांसासह साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त

पिकअप टेम्पो व कत्तलीचे साहित्य असा एकूण ८ लाख ६८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी संगमनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, संतोष खैरे, विजय पवार, योगेश कर्डीले, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांनी केली.